**प्रेस नोट** **दि.१६/०३/२०१९**

## वानवडी पोलीस स्टेशन

## मिळुन आलेल्या मुलीस तिचे आईचे ताब्यात दिले

दि.१६/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. चे सुमारास कमांड हॉस्पीटल रोड, वानवडी, पुणे येथे वडाचे झाडाचे खाली एक सुमारे ०७ वर्षे वयाची मुलगी घाबरलेल्या अवस्थेत रडत असताना वानवडी बाजार मार्शलचे कर्मचारी पोलीस शिपाई कैलास माळकर व पोलीस शिपाई धर्मा चौधरी यांना मिळून आलेने त्यांनी सदर मुलीकडे विचारपूस केली असता तीला तीचे बाबत काहीएक माहिती सांगता येत नव्हती म्हणून त्यांनी सदर मुलीस वानवडी पोलीस स्टेशन येथे डी.ओ. पोलीस हवालदार शिवाजी घुले यांचेकडे आणले असता त्यांनी सदरबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल भोसले यांना सांगीतलेने त्यांनी सदरबाबत तात्काळ तपास करणेबाबत आदेश दिल्याने पोलीस नाईक विनोद भोसले, महिला पोलीस शिपाई राणी खांदवे व महिला पोलीस शिपाई वनिता कोलते यांनी सदर मुलीस शांत करून प्रथम तीचे नाव पत्ता विचारले असता तीने तीचे नाव सांगीतले व यापेक्षा जास्त उपयुक्त माहिती सांगु शकत नसल्याने सदरबाबत प्रथम पोलीस नियंत्रण कक्ष येथे बॉडकास्ट करण्यात आला व वरील स्टाफ यांनी सदर मुलीस घेऊन कोंढवा, कॅम्प, भवानीपेठ या भागात शोध घेतला असता काहीएक सुगावा लागुन आला नाही. त्यानंतर सदरबाबत इतर पोलीस स्टेशनच्या संपर्कात असताना सदर मुलीची आई मुन्नी इसरार शेख रा. सराईबसराई, राणीगंज उत्तरप्रदेश, हि लोहियानगर पोलीस चौकी येथे सदर मुलीची मिसींगची तक्रार देणेबाबत चौकीस गेली असल्याचे समजल्याने सदर मुलीचे वर्णन सांगुन मुलगी त्यांचीच असल्याची खात्री केली. व सदर मुलगी वानवडी पोलीस स्टेशन हद्दीत मिळून आली असल्याचे त्यांना सांगून पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगीतले.

तदनंतर खडक पोलीस स्टेशनकडील मार्शलचे कर्मचारी हे सदर मुलीचे आईस घेऊन वानवडी पोलीस स्टेशन येथे हजर झाले. व त्यांनरंत सदर मुलीबाबत त्यांचेकडून ओळखपत्र मागवुन मुलीची आई असल्याची खात्री करून घेऊन सदर मुलीस तीचे आईचे ताब्यात सुखरूप देण्यात आले असता सदर मुलीचे आईने ती उत्तरप्रदेश येथून ग्रामीण भागातून आली असल्याने व मुलीस पुण्यामधील काहीएक माहिती नाही. त्या मुलगी मिळून येत नसल्याने मी खुप घाबरली होते असे सांगून पुणे पोलीसांमुळेच माझी मुलगी मला सुखरूप परत मिळाली असल्याचे सांगून पोलीसांचे आभार मानले.

